## पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रामीण

| | | |
|---|---|---|
| पोलीस अधिक्षक,कार्यालय | **प्रेस नोट** | दिनांक ०४.०४.२०१७ ०१.०० |

**प्रति,**

**मा.संपादक**

**दैनिक ..........**

**विषय :—औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दाखल /उघडकीस गुन्हयांबाबत.**

यावदारे आपणास सुचित करण्यात येते की, औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दिनांक ०३.०४.२०१७ रोजी खालील प्रमाणे गुन्हे दाखल /उघडकीस आले आहेत.

**०१) पोस्टे चिकलठाणा:—** गुरन । १३५/१७ कलम २७९ ३३७ ३३८ ४२७ ३०४(अ) भादवि सहकलम १३४/१७७ मोवाका नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे अंबादास लिंबाजी वाहुळे वय ३२ वर्ष व्यवसाय मजुरी रा. टाकळी वैद्य ता.जि. औरंगाबाद यांनी फिर्याद दिली की दिनांक ३०.०३.२०१७ रोजी २२.१५वा. दरम्यान यातील मयत नामे अनिल लिंबाजी पवार रा. टाकळी वैद्य ता.जि. औरंगाबाद व फिर्यादी असे त्यांची स्कुटी गाडी क्रं. एमएच २० एचएम १६० वर बसुन जात असताना अज्ञात वाहनाचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे स्कुटीला जोराची धडक देवुन फिर्यादी व मयतास किरकोळ व गंभीर जखमी करून यातील मयत याचे मरणास कारणीभुत व अपघाताची माहीती न देता पळुन गेला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास सफौ देशमुख पोस्टे चिकलठाणा हे करीत आहे

**०२) पोस्टे कन्नड ग्रामिण:—** गुरन । २३/१७ कलम ४५४ ४५७ ३८० भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे लक्ष्मण देवचंद जैस्वाल वय ५२ वर्ष व्यवसाय नौकरी मुख्याध्यापक जि.प. शाळा शिवराई ता. कन्नड यांनी फिर्याद दिली की यातील अज्ञात चोरटयाने फिर्यादी नौकरी करीत असलेल्या जि.प.प्र. शाळा शिवराई येथे किचन रूमचे शेडच्या दरवाजाचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून १) एकुण ८४ जेवणाचे स्टीलच्या प्लेटा २) एक किलो व दोन किलो वजनाचे लोखंडी वजनाचे मापे असा एकुण अंदाजे २४००/—रू.किं. चा माल लबाडीचे इरादयाने चोरून नेले म्हणुन

गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोह/९८१ सोनवणे पोस्टे कन्नडग्रामिण हे करीत आहे.

**आकस्मात मृत्यु:–**

**०१) पोस्टे कन्नड ग्रामिण:–** आ.मृ. नंबर ०९/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार प्रकाश माणिकराव पवार वय ५३ वर्ष व्यवसाय शेती पोलीस पाटील हातनुर ता. कन्नड यांनी खबर दिली की यातील मयत नामे सतिष नानासाहेब पवार वय २२ वर्ष रा. हातनुर ता. कन्नड याने दिनांक ०३.०४.२०१७ रोजीचे १६.००वा. पुर्वी रत्नप्रभा बाळासाहेब पवार यांचे शेतातील जांभळीचे झाडाला पिवळया दोरीने गळफास घेवुन मरण पावला वगैरे खबरी वरून आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोह/९८१ सोनवणे पोस्टे कन्नडग्रामिण हे करीत आहे.

**०२) पोस्टे एमआयडीसी पैठण:–** आ.मृ. नंबर १४/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबरदेणार रंजित आनंदराव वानोळे वय २८ वर्ष पोना/१३६९ पोस्टे एमआयडीसी पैठण यांनी खबर दिली की यातील मयत नामे हरीचंद्र छबुराव आहेर वय ४५ वर्ष रा. खेरगाव ता.पैठण याचा जैनस्पीनर फाटा औरंगाबाद ते पैठण रोडवर अपघात झाला असता त्यास उपचार कामी सरकारी दवाखाना पैठण येथे नेले असता तेथील वैद्यकीय अधिकारी जखमी ईसमास तपासुन मयत झाल्याचे घोषीत केले व त्यांचे पोस्टमार्टम अहवालावरून मृत्यु हा ह्रदय विकाराचे झटक्याने झाला आहे असे वैद्यकीय अधिकारी यांनी कळविले वगैरे मजकुरावरून आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोना/३५८ सैयद पोस्टे एमआयडीसी पैठण हे करीत आहे.

**मुंबई दारूबंदी कायदा:–**

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात विविध पोस्टे ला १८ गुन्हे मुंबई दारूबंदी कायदया प्रमाणे १८ ईसमा विरूध्द दाखल झाले असुन त्यांचे कडुन १४,१७०/–रू. किं देशीदारू च्या २८७ बाटल्या १८० मिलीच्या, तसेच १९ ली. गावठी हातभट्टीची दारू किं. ९५०/–रू. असा एकुण १५,१२०/–रू.किं. माल जप्त करण्यात आला आहे.

मुजुकाः—

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात विविध पोस्टे ला ०२ गुन्हे मुंबई जुगार कायदया प्रमाणे १८ ईसमा विरूध्द दाखल झाले असुन त्यांचे कडुन ३,१३,५००/—रू. किं. चा मुद्येमाल ज्यात नगदी रूपये, मो.सा., मोबाईल, व जुगाराचे साहीत्य असा जप्त करण्यात आला आहे.

स्वाक्षरीत
पोलीस अधिक्षक
औरंगाबाद ग्रामीण करीता

श्री सफौ चव्हाण नियंत्रण कक्ष अधिकारी औरंगाबाद ग्रामीण